सारथी
शाहू विचारांना देऊया गती, साधूया सर्वांगीण प्रगती

सत्यमेव जयते

MKCL
॥ ज्ञानदीप लावू जगी ॥
www.mkcl.org

# छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे

(नियोजन विभागाअंतर्गत महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था) व

# महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (एमकेसीएल), पुणे

सारथी पुणे व एमकेसीएल पुणे यांच्या द्वारे ''छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्त्व विकास व संगणक कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम'' संपूर्ण महाराष्ट्रात तालुकास्तरापर्यंत राबविण्यासाठी **मराठा, कुणबी, कुणबी–मराठा आणि मराठा–कुणबी** समाजाच्या **नॉन क्रिमिलेयर** गटाच्या युवांसाठी **नि:शुल्क** कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत खाली दर्शविल्याप्रमाणे प्रशिक्षणासमोर नमूद पात्रता धारक उमेदवारांकडून विहित नमुन्यातील ऑनलाईन अर्ज मागवण्यात येत आहेत.

| SR. NO. | TITLE OF THE TRAINING PROGRAMME | ENTRY QUALIFICATION (BASIC EDUCATION) | DURATION (MONTH) | NO. OF SEATS (SANCTION INTAKE) |
|---|---|---|---|---|
| 01 | 'CHHATRAPATI SAMBHAJI MAHARAJ SARTHI Digital Employability Enhancement Program (“CSMS-DEEP”) | 10th Std. Pass | 6 Months | 40,000 |

- उपरोक्त कौशल्य विकास प्रशिक्षण हे नि:शुल्क असून सदर प्रशिक्षणाचा प्रशिक्षण खर्च सारथी,पुणे मार्फत करण्यात येईल.
- उपरोक्त कौशल्य विकास प्रशिक्षण हे एमकेसीएल संस्थेच्या अधिकृत अध्ययन केंद्रांमार्फत (ALC) महाराष्ट्र पातळीवर राबविण्यात येईल.
- सदर प्रशिक्षण हे अनिवासी (Non Residential) असून, प्रशिक्षणादरम्यान राहणे व जेवणाची व्यवस्था उमेदवारास स्व:खर्चाने करावी लागेल .
- **मराठा, कुणबी, कुणबी–मराठा आणि मराठा–कुणबी** समाजाच्या नॉनक्रिमिलेयर गटाच्या वयोगट 18 ते 45 मधील गरजू व इच्छुक पात्रता धारक उमेदवारांसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा दिनांक 01/01/2024 पासून सुरु करण्यात आली आहे.
- संबंधित उमेदवारांनी एमकेसीएल संस्थेच्या अधिकृत अध्ययन केंद्राकडे मूळ कागदपत्रांसह स्व:खर्चाने उपस्थित राहावे याची नोंद घ्यावी.
- प्राप्त अर्जांमधून निकषाच्या आधारे अर्जाची छाननी करून व प्रथम येणाऱ्या निवडक उमेदवारांना प्रवेश दिला जाईल. पात्र उमेदवारांची यादी संकेत स्थळावर **(www.mkcl.org/csmsdeep)** योग्य वेळी प्रसिद्ध करण्यात येईल, अपूर्ण असलेले तसेच मुदती नंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
- मराठा उमेदवारास जातीचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेयर/**EWS (Economically Weaker Section)** असल्याचे प्रमाणपत्र, **TC / LC** व **1** वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे .
- कुणबी, कुणबी–मराठा व मराठा–कुणबी उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र व नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
- उमेदवारांनी ज्या प्रशिक्षण केंद्राची निवड केली आहे त्याच प्रशिक्षण केंद्रावर त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल.
- प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या उमेदवारांची यादी **www.mkcl.org/csmsdeep** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
- प्रशिक्षण सुरू झाल्यानंतर, उमेदवारास प्रशिक्षणास गैरहजर राहता येणार नाही अथवा प्रशिक्षण मध्येच सोडून जाता येणार नाही.
- प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमांचे घटक, कालावधी, स्थान व प्रवेश क्षमतेबाबतचे सर्व अधिकार संस्थेकडे राखीव असतील.

## * उमेदवाराने ऑनलाईन अर्जासोबत अपलोड/जोडावयाची कागदपत्रे *

1) विहीत नमुन्यातील व फोटोसहित परिपूर्ण अर्ज
2) प्रशिक्षणानुसार आवश्यक शैक्षणिक गुणपत्रक व प्रमाणपत्र (किमान दहावी पास)
3) सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले जातीचे प्रमाणपत्र मराठा जातीच्या उमेदवाराकडे जातीचे प्रमाणपत्र नसल्यास मराठा जातीचा उल्लेख असलेले **EWS** प्रमाणपत्र (उप विभागीय अधिकारी **SDO** यांचे प्रमाणपत्र) किंवा **TC / LC** (शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला) आणि 1 वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र (**March 31, 2024** पर्यंत वैध)
4) जन्म दाखला
5) नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र/मागील तीन वर्षांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र (उप विभागीय अधिकारी/तहसीलदार यांचे प्रमाणपत्र) (**March 31, 2024** पर्यंत वैध)
6) तहसीलदार यांचे महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र **(Domicile Certificate)**
7) आधार कार्ड
8) उमेदवाराचा फोटो व सही

**प्रशिक्षण ठिकाण:** एमकेसीएल संस्थेचे अधिकृत अध्ययन केंद्र (**ALC**).


अधिकच्या माहितीसाठी संकेतस्थळ: **www.mkcl.org/csmsdeep**

ई–मेल आयडी: **csmsdeep@mkcl.org**

संपर्क क्रमांक: **+91-8956537496**

सारथी संस्थेचे संकेतस्थळ: www.sarthi-maharashtragov.in

एमकेसीएल संस्थेचे संकेतस्थळ: www.mkcl.org